N0 201604111 8

949

RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष २, अंक १५] सोमवार, एप्रिल ११, २०१६/चैत्र २२, शके १९३८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक १७

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.**—महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. | पृष्ठे १-३ |

दिनांक ७ एप्रिल २०१६ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रकाश हिं. माळी,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ११ एप्रिल २०१६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी**, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६६ चा महा. ४१. **आणि ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ५ फेब्रुवारी २०१६ रोजी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, २०१६, प्रख्यापित केला होता ; २०१६ चा महा. अध्या. ३.

**आणि ज्याअर्थी**, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या सदुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अधिनियम, २०१६ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, दिनांक ५ फेब्रुवारी २०१६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

No 201604118

995



सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २५५ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त संहिता " असा केलेला आहे) याच्या कलम २५५ मध्ये, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येतील :— १९६६ चा महा. ४१.

"(४) कोणत्याही महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्यापुढे दाखल केलेले कोणतेही अपील, ज्या दिनांकास असे अपील दाखल केले असेल त्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीच्या आत निकालात काढण्यात येईल :

परंतु, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अधिनियम, २०१६ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी दाखल केलेले असे कोणतेही अपील, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीच्या आत निकालात काढण्यात येईल : २०१६ चा महा. ११.

परंतु आणखी असे की, राज्य शासनास, किंवा जो अपील प्राधिकाऱ्यास वरिष्ठ असेल अशा, त्याबाबतीत पदनिर्देशित केलेल्या जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यास, असे कोणतेही अपील निकालात काढण्यासाठी अपवादात्मक परिस्थितीत, कारणे लेखी नमूद करून, आणखी सहा महिन्यांचा कालावधी वाढवून देता येईल.

(५) जर अपील प्राधिकारी, पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत कोणतेही अपील पुरेशा कारणाशिवाय निकालात काढण्यात कसूर करील तर, तो, त्यास लागू असलेल्या संबंधित शिस्तभंगविषयक नियमांनुसार शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरेल.".

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २५७ ची सुधारणा.

३. उक्त संहितेच्या कलम २५७ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, दुय्यम अधिकाऱ्याच्या निर्णयाच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, कोणत्याही महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्याकडून या पोट-कलमाअन्वये किंवा पोट-कलम (२) अन्वये अशी कोणतीही कार्यवाही सुरू करण्यात येणार नाही. ";

(ख) पोट-कलम (३) मध्ये,—

(एक) पहिल्या परंतुकाच्या अगोदर, पुढील परंतुके समाविष्ट करण्यात येतील :—

" परंतु, कोणत्याही महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्यापुढे दाखल केलेली कोणतीही कार्यवाही ही, ज्या दिनांकास अशी कार्यवाही दाखल केली असेल त्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीच्या आत निकालात काढण्यात येईल :

परंतु आणखी असे की, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अधिनियम, २०१६ याच्या प्रारंभाच्या दिनांकास, कोणत्याही महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्यापुढे, या कलमाखालील कोणतीही प्रलंबित कार्यवाही ही, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीच्या आत निकालात काढण्यात येईल : २०१६ चा महा. ११.

परंतु तसेच, राज्य शासनास, किंवा जो पुनरीक्षण प्राधिकाऱ्यास वरिष्ठ असेल अशा, त्याबाबतीत पदनिर्देशित केलेल्या जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यास, अशी कोणतीही कार्यवाही निकालात काढण्यासाठी अपवादात्मक परिस्थितीत, कारणे लेखी नमूद करून, आणखी सहा महिन्यांचा कालावधी वाढवून देता येईल :

परंतु तसेच, जर पुनरीक्षण प्राधिकारी, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत अशी कोणतीही कार्यवाही, पुरेशा कारणाशिवाय, निकालात काढण्यात कसूर करील तर, तो, त्यास लागू असलेल्या संबंधित शिस्तभंगविषयक नियमांनुसार शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरेल : ";

प्र०क्र० ९५ ९६९

क्र./रा.भू.अ.आ.का.3/मिळकत पत्रिका अद्यावतीकरण/12
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि
अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे कार्यालय
दिनांक- 28/01/2013 28 JAN 2013

**विषय :- राष्ट्रीय भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमाअंतर्गत अधिकार अभिलेख अद्यावत करुन दरमहा वेबसाईटवर प्रसिध्द करणेसाठी विशेष तज्ञांच्या समिती नेमणे**

उपरोक्त विषयांकीत कामी राष्ट्रीय भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत भूमि अभिलेखाच्या आधुनिकीकरणामध्ये विविध योजना केंद्र शासनाकडुन राबविल्या जात आहेत.महसुल विभाग,भूमि अभिलेख विभाग व नोंदणी विभाग या तीनही विभागांना आज्ञावलीव्दारे जोडले जाऊन नोंदणी झालेल्या सर्व दस्तऐवजांचे फेरफार घेऊन आज्ञावलीतुनच अधिकार अभिलेख अद्यावत करणेची ई फेरफार ही एक महत्वाची योजना आहे.यामध्ये अधिकार अभिलेख अद्यावत असणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी परिरक्षण भूमापक / निमतानदार यांचेकडील प्रॉपर्टी कार्ड अधिकार अभिलेख अद्यावत करुन संपुर्ण डाटा युनिकोड मध्ये रुपांतरीत करण्याची प्रक्रीया प्रगतीत आहे. ई फेरफार ही वेब बेस्ड आज्ञावली यशस्वी करण्यासाठी अधिकार अभिलेख अद्यावत असणे अत्यंत आवश्यक आहे. त्या अनुषंगाने नियंत्रण करण्यासाठी विशेष तज्ञांची खालील समिती नेमण्यात येत आहे.

**डोमेन एक्सपर्ट ग्रुप (विषय तज्ञ)**

| अ.क्र | अधिकारी यांचे नाव | अधिकारी यांचे पदनाम |
|---|---|---|
| 1 | श्री.गिरीश राव | उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (रा.भू.अ.आ.का.) |
| 2 | श्री.शाम खामकर | उपसंचालक भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश, नाशिक |
| 3 | श्री. अनिल लोखंडे | जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख ~~संलग्न उपसंचालक भूमि अभिलेख पुणे प्रदेश पुणे~~ रायगड |
| ✗ 5 | श्री बाळासाहेब काळे | प्राचार्य, भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी औरंगाबाद |
| 4 | श्री.समिर दातार | तांत्रिक संचालक,रा.भू.अ.आ.का. |
| 6 | श्री. सुनिल शिंदे | जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख ~~सांगली~~ परभणी |
| 7 | श्री.जयंत निकम | जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख,मुंबई |
| 8 | श्री.अजय कुलकर्णी | जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, ~~नाशिक~~ अकोला |
| 9 | श्री.विष्णु शिंदे | जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख,~~अमरावती~~ सांगली |
| ✗ 10 | श्री.गजानन ढाबेराव | जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, वाशिम |
| 11 | श्री. भुषण मोहिते | उप अधीक्षक भूमि अभिलेख, ~~जळगांव~~ सातारा |
| ✗ 12 | श्री.सुनिल इंदलकर | नगर भूमापन अधिकारी क्रमांक 1 पुणे |
| 13 | श्री.सुदाम जाधव | ~~नगर भूमापन अधिकारी, कोल्हापूर~~ सातारा. |
| 14 | श्री.शंभुराजे वाबळे | नगर भूमापन अधिकारी,~~मुलुंड~~ चेंबूर |